## विद्यापीठस्तरीय व्यक्तिमत्व विकास अभ्यासक्रमाचे उद्घाटन

### विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमाचा लाभा घ्यावा– प्राचार्य डॉ राजेश जयपूरकर, माजी प्र–कुलगुरू


डॉ. मुरलीधरजी वाडेकर


श्री. जगदीशभाऊ गुप्ता


श्री. हर्षवर्धनजी देशमुख


श्री. विजयजी दर्डा


ॲड. मोतीसिंगजी मोहता


श्रीमती शिलाताई राठी

विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास व्हावा यादृष्टीने सिपना शिक्षण प्रसारक मंडळ, अमरावती व्दारा संचालित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय चिखलदरा, जिजामाता महाविद्यालय, बुलडाणा, आर.ए. कला, श्री एम. के. कॉमर्स ॲन्ड श्री एस. आर. राठी विज्ञान महाविद्यालय, वाशिम, अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ, आणि आर. एल. टी सायंन्स महाविद्यालय, अकोला यांच्या संयुक्तविद्यमाने अमरावती, अकोला, यवतमाळ, वाशिम आणि बुलडाणा या पाच जिल्हयातील विद्यार्थ्यांकरीता दिनांक ०६ डिसेंबर २०२ ते ११ डिसेंबर २०२१ पर्यंत व्यक्तिमत्व विकासावर आधारित विद्यापीठस्तरीय अभ्यासक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन दिनांक ०६ डिसेंबर २०२१ रोजी डॉ. मुरलीधरजी वाडेकर, सहसंचालक, उच्च शिक्षण अमरावती विभाग, अमरावती यांच्या हस्ते पार पाडणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्री. जगदीशजी गुप्ता, अध्यक्ष सिपना शिक्षण प्रसारक मंडळ, अमरावती तर मा. श्री. हर्षवर्धनजी देशमुख, मा. श्री. विजयजी दर्डा, मा. श्री. मोतिसिंगजी मोहता, मा. शिलाताई सुभाषजी राठी, मा. श्री. श्यामसुंदरजी मुंधडा, मा. श्री. डॉ. रविन्द्रजी कडू, मा. श्री. शेषरावजी खाडे, मा. श्री. पवनजी माहेश्वरी, मा. श्री. प्रकाशजी चोपडा, विविध महाविद्यालयाच्या पालक संस्थेचे अध्यक्ष, सचिव , व्यवस्थापन मंडळ, प्राचार्य, शिक्षक प्रतिनिधी व इतर मान्यवर शेकडो विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत पार पाडणार आहे.

या अभिनव नि:शुल्क अभ्यासक्रमाचे आयोजन ऑनलाईन पध्दतीने होत आहे. या अभ्यासक्रमामध्ये व्यक्तीमत्व विकास विकसित करण्याच्यादृष्टीने सकारात्मक विचार करणे, जीवन कौशल्ये विकसीत करणे, रोजगार क्षमता कौशल्य विकसीत करणे, उद्योजकता कौशल्ये विकसीत करणे इत्यादी उद्दीष्टये ठेवून अभ्यासक्रमाचे आयोजन करण्यात आले. तसेच या अभ्यासक्रमामध्ये स्वत:ला जाणून घेणे, अध्ययन कौशल्ये, साहस, सांघिक क्षमता वाढविणे, प्रेरणा, ध्येय ठेवणे, कॉरपोरेट संस्कृती, सादरीकरण कौशल्य विकसित करणे, वेळ व्यवस्थापन , ताणतणाव व्यवस्थापन, नैतिकता, सचोटी आणि योग्यता सिध्द कसे करावे या विषयावर रोज २ तास असे ३० तासांचा सहा दिवसीय अभ्यासक्रम पार पाडणाार आहे. यामध्ये सहभागी विद्यार्थ्यांना ५० टक्के उपस्थिती, फिडबॅक आणि असाईनमेन्ट दिलेल्या विद्यार्थ्यांनाच प्रमाणपत्र मिळणार आहे.

या अभ्याक्रमासाठी विविध तज्ज्ञमंडळीचे मार्गदर्शन लाभणार आहे या मध्ये डॉ. पकंजा एस. इंगळे (अमरावती), प्रा. अनुपमा मधूर लढ्ढा (अमरावती), डॉ. पवन देशमुख (बडनेरा), डॉ. अविनाश मोहरील (अमरावती), डॉ. पल्लवी एन मांडवगडे (अमरावती), प्रा. प्रतीश नंदनवार (बंगलुरू), निर्मला एस. जैन (हैद्राबाद), प्रा. गजानन पी. हेडाऊ (मुंबई), प्रा. पुष्पा झामरकर (नागपूर), प्रा. डॉ. दिनेश खेडकर (अमरावती) इत्यादि मान्यवर वेगवेगळया विषयांवर आपले अमूल्य विचार मांडणार आहेत.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाकरीता प्राचार्य डॉ. राजेश जयपूरकर, प्राचार्य कॅप्टन प्रशांत. पी. कोठे, प्राचार्य डॉ. आर.ए. मिश्रा, प्राचार्य डॉ. व्ही. डी. नानोटी, प्राचार्य डॉ. आर. एफ. पगारीया यांच्या मार्गदर्शनात डॉ. ज्ञानेन्द्र एस हेडाऊ, डॉ. प्रशांत मुक्कावार, डॉ. विवेक मेश्राम, डॉ. सुबोध एन. चिंचोळे, डॉ. पुनम टी अग्रवाल, डॉ. शशी पवार त्याचप्रमाणे तांत्रिक सहाय्य करणारे, प्रा. बी. एस. देशमुख, डॉ. एस. जी. महाजन, प्रा. आर. पी. राहाटे, प्रा. ए. आर. कान्हू, प्रा. एस. एल. कोत्तेवार, प्रा. व्ही. एम. मोरे, श्री. ए. जी. ढगे यांच्यासह महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी अथक परिश्रम घेत आहे.

या व्यक्तिमत्व विकास अभ्यासक्रमाचा लाभ जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन प्राचार्य डॉ. राजेश जयपूरकर, माजी प्र–कुलगुरू यांनी केले आहे.